**UNIVERSITY GRANTS COMMISSION**
**WESTERN REGIONAL OFFICE**
**GANESHKHIND, PUNE – 411 007.**

# MRP(Executive Summary)

1. NAME AND ADDRESS OF THE PRINCIPAL INVESTIGATOR :- **Dr.Shinde Ramesh Arjun, Arts and Commerce College Madha Tal-Madha Dist :- Solapur 413209**

**F-23-1593/14 (General/201(WRO) Dated 22-03-2017**

TITLE OF THE PROJECT :- **१९६० नंतरची उपयोजित काव्यसमीक्षा**

१९६० नंतरची उपयोजित काव्यसमीक्षा हा विषय संशोधनासाठी उद्दीष्ट्ये निश्चित केली आहेत. हा विषय व कालखंड निश्चित करत असताना काही भूमिका यापाठी मागे अधोरखित केल्या आहेत. स्वातंत्र्यानंतर एकूण सर्वच समाजजीवनामध्ये विविधांगी परिवर्तने झाली. हे बदल घडत असताना सर्वच पातळीवर मानवी जीवनाचा, त्याच्या सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणाचा विविधांगी विकास झाला. पाश्चात्त्य विचारक्रांतीतून आलेली विविध बीजे याच कालखंडामध्ये रुजू पाहत होती. त्यातून मानवी अस्तित्वाचा, मनाचा व संस्कृतीचा नव्याने अन्वयार्थ लावला जावू पाहत होता. या सर्व परिवर्तनाचा सर्वच क्षेत्रावर प्रभाव जाणवत होता. पर्यायाने मराठी साहित्यावरही याचा काहीएक परिणाम झाला तो याच कालखंडामध्ये. स्वातंत्र्योत्तर काळ निश्चित करण्यापाठीमागील दुसरी भूमिका बा.सी.मर्ढेकर यांच्या कविता व साहित्यशास्त्रीय लेखनाच्या प्रभावाची आहे. मर्ढेकरांनी मराठी साहित्याची परपुष्ठता मांडून त्यात परिवर्तन करणाऱ्या सौंदर्यशास्त्रीय विचारांची मते मांडली. मर्ढेकरांच्या या साहित्यकेंद्री, संहिताकेंद्री साहित्यविचारांचा प्रभाव मराठी वाङ्मयातील सर्वच लेखनावर झाला. लेखकाची आत्मनिष्ठा, कलाकृतीची स्वायत्तता यांना महत्त्व आले. त्यामुळे मराठी काव्यसमीक्षेमध्ये याचा प्रभाव १९६० नंतरच अधिक जाणवू लागला. याच कालखंडात जीवनवादी साहित्याची मांडणी करणारे विविध समीक्षक उदयास आले. त्यामुळे पारंपरिक कलावादी, रूपवादी मांडणी करणारे समीक्षालेखन कमी झाले. तसेच स्वातंत्र्योत्तर काळातच युरोपीय साहित्यसिद्धांताचा परिचय झाला. याधारे समीक्षा लिहिली जाऊ लागली.म्हणून हा स्वातंत्र्योत्तर कालखंडाचा बिंदू संशोधनासाठी निश्चित केला आहे.

समीक्षा हा कोणत्याही वाङ्मयव्यवहाराचा एक महत्त्वाचा घटक असतो. साहित्याचे आकलन, विश्लेषण, मूल्यमापन व व्यवस्थापन करण्याचे काम समीक्षा करत असते. साहित्यप्रकाराच्या

विकासाबरोबरच मराठी समीक्षा कशी बदलत गेली हे पाहणे महत्त्वाचे ठरते. एखाद्या कालखंडात लिहिल्या गेलेल्या त्या त्या साहित्याप्रकाराच्या समीक्षेतून त्या त्या साहित्याची गुणवैशिष्ट्ये व्यक्त होत असतात. या प्रकारच्या समीक्षेतून त्या साहित्यप्रकाराचे व्यवस्थापन, त्याचा सांकल्पिक व्यूह निश्चित होण्यासाठी ही समीक्षा मदत करत असते. वेगवेगळ्या दृष्टिकोणाधारे साठोत्तरी कालखंडात कविता या वाङ्मयप्रकारासंबंधी, त्याच्या स्वरूपासंबंधी उपयोजित स्वरूपाचे समीक्षा लेखन केले गेले आहे. या कालखंडातील उपयोजित समीक्षेच्या क्षेत्रामध्ये मोठी उपलब्धी आहे ती बहुविध अंगी आहे. या समीक्षाव्यवहाराचे काहीएक क्रमबद्ध अशा प्रकारचे वर्गीकरणाद्वारे व्यवस्थापन करणे हे प्रस्तुत संशोधनाचे उद्दिष्ट आहे. मराठी कविता कशी बदलत गेली, त्याला ही समीक्षा सन्मुख झाली का हे पाहणे या अभ्यासाचे उद्दिष्ट आहे.

साहित्याच्या अनेककेंद्रित्वाचे आकलन, व्यवस्थापन, मूल्यमापन व स्थाननिश्चिती करण्याचे कार्य हे उपयोजित स्वरूपाची काव्यसमीक्षा करत असते. कालपरिवर्तनाबरोबर कलाव्यवहारातही नवे दृष्टिकोण वादचर्चा उपस्थित होतात. त्या दृष्टिकोणाचा प्रभाव या उपयोजित स्वरूपाच्या समीक्षेतून पडत असतो. चरित्रात्मक समीक्षा ते विविध आशयरूपलक्ष्यी दृष्टिकोणांचा अढळ या उपयोजित स्वरूपाच्या समीक्षेतून झालेला आहे.ही काव्यसमीक्षा मोठ्या प्रमाणात विविध दृष्टिकोणाधारे प्रकटलेली आहे. ही समीक्षा घडत असताना तिच्यामध्ये विविध दृष्टिकोणांची प्रभावी अशी केंद्रे उपस्थित राहिली आहेत. ती कधी आशयलक्ष्यी अंगाने प्रकटत आलेली आहे, तर कधी रूपलक्ष्यी अंगाने, तर कधी या दोहोंचा अंतर्भाव असणारी समीक्षा लिहिली गेली आहे. काही वेळा ती निव्वळ संहिताकेंद्री अक्षाच्या अंगाने लिहिली गेली आहेत. तर काही वेळा संहिताबाह्य दृष्टिकोणांनी ती नियंत्रित झालेली आहे. असे काव्यविषयक दृष्टिकोण व विविधांगी काव्यसमीक्षेची उपलब्धी ही त्या त्या वाङ्मयीन परंपरेला पोषक ठरते. या सर्वांचा विविधांगी शोध या संशोधनातून मांडला  आहे.प्रत्येक वाङ्मयप्रकाराची समीक्षा ही त्या त्या वाङ्मयप्रकाराची वैशिष्ट्ये, तत्त्वे व संकल्पना ध्यानात घेत असते. त्या त्या भाषिक परंपरेतील गंभीर स्वरूपाचा समीक्षाव्यवहार त्या त्या वाङ्मयीन पर्यावरणास संकल्पनात्मक चौकट प्राप्त करून देत असतो. तिला काहीएक सैद्धांतिक व संकल्पनात्मक चौकट असते. त्याधारे साहित्यकृतीतील व वाङ्मयव्यवहारातील विविध प्रश्नांची वेगवेगळ्या प्रकारे व विविध पातळ्यांवर चर्चा होत असते.

विविध कालखंडातील समीक्षकांनी समकालीन कवितेची एक व्यवस्था आपल्या समीक्षेमधून लावली आहे. बदलत्या सामाजिक परिप्रेक्ष्यामध्ये कवितेची चिकित्सा केली आहे. कला, साहित्य आणि संस्कृती याविषयीच्या नवनव्या व आधुनिक भूमिकांचा स्वीकार करून कविता या

वाङ्मयप्रकाराचे काहीएक सिद्धांतन केले आहे. ते विविधांगी व महत्त्वपूर्ण आहे. या समीक्षेत जसे आधुनिक युरोपियन सिद्धांतांचे दृष्टिकोण आहेत तसेच व्यक्तिगत समीक्षेची मातब्बरीही आहे. नवनवी अर्थनिर्णयने आहेत. सिद्धांतनाकडे जाण्याची दिशा आहे. उपयोजित समीक्षेची समृद्धता व विपुलताही आहे.

प्रस्तूत संशोधनामध्ये १९६० नंतरच्या उपयोजित मराठी काव्यसमीक्षेचा व मराठी कवितेच्या स्वरूप परिवर्तनाचा शोध घेतला आहे. अन्य वाङ्मयप्रकाराच्या तुलनेत कविता या वाङ्मयप्रकाराची निर्मिती या कालखंडामध्ये अधिक्याने झाली आहे. स्वातंत्र्योत्तर बदलणाऱ्या परिस्थितीचा परिणाम व प्रभाव सर्वच क्षेत्रावर जाणवत होता. पर्यायाने कविता या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप या काळात विशेषत्वाने बदलले. सामाजिक भानाचे वास्तवदर्शीचित्रण करणारे कवी आपली नाळ पारंपरिक संतकवितेशी जोडू लागले. विसाव्या शतकातील उपयोजित मराठी काव्यसमीक्षा बहुविध स्वरूपाची आहे. ती तात्त्विक स्वरूपाची आहे तशीच ती उपयोजित स्वरूपाचीही आहे. ही समीक्षा आशयाला महत्त्व देणारी आहे तसेच ती रूपालाही महत्त्व देते. व्यापक अशा सामाजिक-सांस्कृतिक-परिप्रेक्ष्यात काव्याचा विचार करणारी ही समीक्षा आहे. समकाळामध्ये कवितेसंबंधी निर्माण झालेल्या प्रश्नांचा शोध या समीक्षेत आहे. या कालखंडातील काव्यसमीक्षा ही स्वतंत्र ग्रंथरूपाने, लेखरूपाने व विविध नियतकालिकांमधून प्रसिद्ध झालेली आहे. विपुलता आणि बहुविधता हे तिचे विशेष होत. अर्धशतकातील मराठी काव्यसमीक्षेचे स्वरूप व तिचे फलस्वरूप शोधण्याच्या दृष्टीने हा अभ्यास महत्त्वाचा आहे.

साठोत्तरी कालखंडामध्ये समीक्षेच्या क्षेत्रात विविधांगी प्रगती झाली. विविध ज्ञानशाखांचा संबंध साहित्य कलांशी जोडला जावू लागला.त्यामुळे साहित्याला व्यापक असे स्वरूप आले. मानसशास्त्र, भाषाशास्त्र व समाजशास्त्र या आधुनिक संकल्पनांच्या परिचयामुळे कवितेच्या आकलनासाठी विचार होऊ लागला. परिणामी कवितेची सुप्त-अदृश्य अंगे यातून व्यक्त होऊ लागली. साम्यवादी विचारांच्या प्रभावातून समाजाची एक क्रांतीकारी मांडणी होऊ लागली. त्यास पूरक असे काव्यशास्त्र मार्क्सवादी दृष्टिकोणातून निर्माण झाले. त्यातून कविता, समाज व आर्थिक विषमता याविषयी दिशादर्शन होऊ लागले.

वाङ्मयासंबंधी निर्माण होणाऱ्या कोणत्याही प्रश्नाचा विचार हा साहित्यकृतीच्या वस्तुरूपाशी संबंधी असतो याची जाणीव मर्ढेकरांच्या समीक्षालेखनाने करून दिली. तेव्हापासून समीक्षकाचे लक्ष साहित्यकृतीच्या वस्तुरूपाशी, त्याच्या संहितेकडे केंद्रित झाले. मर्ढेकरांच्या कवितेचा व त्यांच्या साहित्यसमीक्षाविषयक सिद्धांतांचा प्रभाव स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये अधिक्याने जाणवतो. समकालीन

Arts & Commerce College Madha

वास्तवाला भिडणारी काव्याभिव्यक्ती व त्यातून येणारी वाङ्मयीन महात्मता यांचा सर्वच लेखक-कवींवर प्रभाव पडला त्यातून कवितेच्या समीक्षेला व कवितेला एक नवी दिशा मिळाली. साठोत्तरी कालखंडातील या कवींवर याचा अधिक प्रभाव जाणवतो. स्वतः सर्जनशील कवी असणाऱ्यानी कवितेविषयी वस्तुनिष्ठपणे आकलन मांडले आहे. यातून सर्जनशील लेखन व समीक्षाव्यवहार हा समांतरपातळीवर आला. मर्ढेकरी कवितेच्या अनुषंगाने दुर्बोधता वगैरे काव्य लक्षणांची चर्चा येथे मागे पडली व आत्मभान, आत्मजाणिवा यातून समाजमनाचे दिग्दर्शन करणारे समीक्षालेखन होऊ लागले. समीक्षेतील आधुनिक संकल्पनांमधून शैलीगत घटक, मानसशास्त्रीय दृष्टिकोण यांचे उपयोजन या समीक्षेने मांडले. त्यातून एकूण मराठी कवितेचे नवे अर्थनिर्णयन होऊ लागले.

मराठीमध्ये काव्यप्रकारांची विविधता स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात आढळते. सामाजिक व सांस्कृतिक संघर्षामधून निर्माण होणारे हे विविध काव्यप्रकार कवितेच्या या वाङ्मयप्रकारांच्या विविध शक्यतांचा शोध घेणारे आहेत. अशा या वेगवेगळ्या कालखंडात निर्माण झालेल्या काव्यप्रकाराचे स्वरूप, त्याचे गुणविशेष व वाङ्मयीन परंपरा या उपयोजित काव्यसमीक्षेमधून स्पष्ट करण्यात आली. काळानुरूप उगम व अस्तगत होणाऱ्या या काव्यप्रकारांनी मराठी कवितेच्या विकासास हातभार लावल्याचे निरीक्षण या समीक्षकांनी नोंदविले आहे.

१९६० नंतरची उपयोजित काव्यसमीक्षा आशयाला महत्त्व देणारी आहे तसेच ती रूपालाही महत्त्व देते. व्यापक अशा सामाजिक-सांस्कृतिक-परिप्रेक्ष्यात काव्याचा विचार करणारी आहे. या कालखंडातील काव्यसमीक्षा ही स्वतंत्र ग्रंथरूपाने, लेखरूपाने व विविध नियतकालिकांमधून प्रसिद्ध झालेली आहे. विपुलता आणि बहुविधता हे तिचे विशेष होत. अर्धशतकातील मराठी काव्यसमीक्षेचे स्वरूप व तिचे फलस्वरूप शोधण्याच्या दृष्टीने हा अभ्यास महत्त्वाचा आहे. *१९६० नंतरच्या उपयोजित काव्यसमीक्षेचे* स्वरूप व तीमधील विविधता यांचा अभ्यास या संशोधनामधून स्पष्ट केला आहे. या कालखंडातील उपयोजित काव्यसमीक्षा विपुल प्रमाणात व बहुविध अशा स्वरूपाची आहे. गेल्या अर्धशतकामध्ये कवितेची निर्मिती विपुल प्रमाणात झाली आहे. त्यामुळे या काळात ही काव्यसमीक्षा केंद्रवर्ती राहिली आहे. ती आजतागायत तितक्याच विस्ताराने होत आहे. या सर्वांमधून बदलती काव्यसंस्कृती व समीक्षेची बहुविधता स्पष्ट झाली आहे.

Signature of Principal Investigator

Signature of the Principal

Principal,
Arts & Commerce College.
Madha. Dist. Solapur.